## MAHARASHTRA ACT No. XXII OF 1963.

### AN ACT TO REPEAL THE MAHARASHTRA LOCAL AUTHORITIES (POSTPONEMENT OF ELECTIONS FOR THE DURATION OF THE EMERGENCY) ACT, 1962.

## सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२.

[राज्यपाल यांची संमति मिळाल्यानंतर "महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रांत" दिनांक २४ एप्रिल १९६३ रोजीं प्रथम (इंग्रजींत) प्रसिद्ध केलेला].

### महाराष्ट्र स्थानिक प्राधिकारी संस्था (आणीबाणीच्या परिस्थितीच्या कालावधींत निवडणुका लांबणीवर टाकण्याबाबत) अधिनियम, १९६२ हा रद्द करण्याबाबत अधिनियम.

ज्याअर्थी, महाराष्ट्र स्थानिक प्राधिकारी संस्था (आणीबाणीच्या परिस्थितीच्या कालावधींत निवडणुका लांबणीवर टाकण्याबाबत) अधिनियम, १९६२ हा रद्द करणें इष्ट आहे; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या चौदाव्या वर्षी याद्वारें पुढीलप्रमाणें अधिनियम करण्यांत येत आहे :—

लघु संज्ञा.

१. या अधिनियमास महाराष्ट्र स्थानिक प्राधिकारी संस्था (आणीबाणीच्या परिस्थितीच्या कालावधींत निवडणुका लांबणीवर टाकण्याबाबत) (रद्द करणें) अधिनियम, १९६३ असें म्हणावें.

सन १९६२चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३९ रद्द करणें व बचाव.

२. महाराष्ट्र स्थानिक प्राधिकारी संस्था (आणीबाणीच्या परिस्थितीच्या कालावधींत निवडणुका लांबणीवर टाकण्याबाबत) अधिनियम, १९६२, हा याद्वारें रद्द करण्यांत येत आहे :

परंतु, उक्त अधिनियम रद्द करण्यांत आला असला तरीहि, व ज्या अधिनियमान्वयें किंवा अधिनियमानुसार कोणत्याहि प्राधिकारी संस्थेची रचना किंवा स्थापना करण्यांत आली असेल, अशा अधिनियमांत कांहींहि असलें तरीहि,—

(अ) आतां रद्द केलेल्या अधिनियमाच्या कलम ३ अन्वयें वाढविण्यांत आलेला सभासदांचा किंवा सदस्यांचा पदावधि, व उपरिनिर्दिष्ट अधिनियमाचें कलम ४, कंडिका (अ) अन्वयें नामनिर्दिष्ट केलेल्या सभासदांचा व सदस्यांचा, किंवा कंडिका (ब) अन्वयें नेमण्यांत आलेल्या कोणत्याहि अधिकाऱ्यांचा पदावधि, हा दिनांक ३१ डिसेंबर १९६३ रोजीं संपुष्टांत येईल ; परंतु सभासद किंवा सदस्य, किंवा यथास्थिति अधिकारी, हे संबंधित अधिनियमान्वयें योग्य रीतीनें पुनर्रचना केलेल्या स्थानिक प्राधिकारी संस्थेच्या ज्या पहिल्या सभेंत गणपूर्ति होईल त्या सभेच्या तारखेपर्यंत पदावर राहतील ;

(ब) आतां रद्द केलेल्या आधिनियमांच्या कलम ९ अन्वयें कोणत्याहि अधिकाऱ्याकडे सोंपविलेले कोणतेहि अधिकार, कर्तव्यें व कामें, हीं ज्या नगरपालिका कमिशनरचे किंवा अधिकाऱ्याचे अधिकार, कर्तव्यें व कामें अशा रीतीनें सोपवून देण्यांत आलीं होती त्या नगरपालिका कमिशनरच्या किंवा अधिकाऱ्यांच्या नेमणुकीची मुदत संपुष्टांत येईपर्यंत, परिणामक्षम असण्याचें चालू राहील ;

(क) जर कोणतीहि सल्लागार परिषद नेमलेली असल्यास राज्य सरकारनें त्याबाबतींत काढलेल्या अधिसूचनेद्वारें ती आधींच विघटित करण्यात आली नसेल तर, ती दिनांक ३१ डिसेंबर १९६३ पर्यंत काम करणें चालूं ठेवील.

अर्थविवरण. ३. "स्थानिक प्राधिकारी संस्था" या संज्ञेचा अर्थ, तिला आतां रद्द केलेल्या अधिनियमांत जो अर्थ दिलेला असेल तोच अर्थ असेल.

(True translation)
P. S. THORAT,
Examiner of Books and Publications, Bombay.

## MAHARASHTRA ACT No. XXIII OF 1963.

## THE MAHARASHTRA REMOVAL OF DISQUALIFICATIONS (OF HOLDERS OF OFFICES IN CO-OPERATIVE SOCIETIES) ACT, 1963.

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राज्यपाल यांची संमति दिनांक २६ एप्रिल १९६३ रोजीं मिळालेली असल्यामुळें तो याद्वारें सर्व लोकांच्या माहितीसाठीं प्रसिद्ध करण्यांत येत आहे :—

बी. पी. दलाल,
महाराष्ट्र शासनाचे सचिव,
विधि व न्याय विभाग.